Vol II Issue VI Dec 2012

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 6, Dec. 2012
ISSN:-2231-5063
Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

GRT

# कचेश्वर ब्रह्मे आणि 'आदि'

**किशोर जनार्दन लांडेपाटील**

इतिहास विभाग
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय,
राजगुरूनगर, ता. खेड, जि. पुणे.

**प्रस्तावना :–**

प्रत्येक गावाच्या जडण घडणीत अगणित लोकांचे योगदान दडलेले असते. काहीवेळा एखाद्या व्यक्तीच्या कार्यकर्तृत्त्वाचा आदर व स्मरण म्हणून त्या व्यक्तीचे नावावरूनही गावाचे नामकरण करण्यात येते.1 अर्थात प्रत्येक वेळी असे असेलच असे नाही व गावाच्या जडण घडणीत अनेक व्यक्ती असल्याने ते अशक्यही ठरते. परंतु अशा व्यक्तींचा वारसा गाव कोणत्या ना कोणत्या रूपात जपत असते. गाव परंपरेला त्यांनी दिशा दिलेली असते. गावाची संस्कृती व प्रवृत्ती यांना आकार दिलेला असतो.

पुण्याच्या उत्तरेला खेड तालुका अशा असंख्य दिशादर्शक, समाज घडविणा—यांचा परीसर, या परीसराने अशा अनेक युगपुरूशांचे संस्कार घेत इतिहासाला दिशा दिली. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या नावाचा उल्लेखही त्यासाठी पुरेसा आहे.या लोकोत्तर पुरूशांच्या प्रभावात येथील पिढया घडत गेल्या. चाकण राजगुरूनगर परिसरातील असेच एक महत्त्वाचे घराणे म्हणजे ब्रह्मे घराणे होय. या घराण्यात अनेक नामवंत व कर्तृत्त्ववान व्यक्ती झाल्या. अगदी अलीकडील काळात भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे हुतात्मा शिवराम हरि राजगुरू ही याच घराण्यातील, या घराण्याचे मूळ आडनाव ब्रह्मे परंतु पुढे राजगुरू नाव रूढ झाले ते कचेश्वर ब्रह्मे यांचे मुळेंच.

**कचेश्वर ब्रह्मे**

चाकणचे ब्रह्मे घराणे ऐतिहासिक आहे. ब्रह्मे घराण्यातील मेघनाथ शंकरभट शहाजी राजांच्या पदरी होते. त्यांना ब्रह्मत्त्वाबद्दल राजांकडून इनामही होते. ते पुढे सिध्देश्वर ब्रह्मे यांनाही मिळत होते. सिध्देश्वर ब्रह्मे यांना छत्रपती शिवाजी महाराजांनी वर्शासन दिले होते. जिजाऊंना तुमचा पुत्र राज्यकर्ता होईल असा आशिर्वाद सिध्देश्वर ब्रह्मे यांनी दिला होता असे सांगतात. अशा या छत्रपतींची कृपा लाभलेल्या घराण्यात कचेश्वरांचा जन्म 16452 चे सुमारास झाला. त्यांचे घराणे कट्टर वैदिक होते. पुढे कचेश्वरांचेही छत्रपतींच्या वारसांशी निकटचे संबंध राहिले. छत्रपती शाहू बरोबरच्या त्यांच्या जवळीकीतून त्यांना व त्यांच्या घराण्यास राजगुरू नाव रूढ झाले. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहु सुटून महाराश्ट्रात आले. त्यांनी आता आम्ही राज्य करू अशी भूमिका घेतल्याने ताराबाईशी त्यांचा संघर्श अटळ ठरला. या मराठा वारसा युध्दात अत्यंतीक महत्त्वाची या निर्णायक तसेच ताराबाई पक्षास धक्कादायक लढाई खेड येथे झाली. या लढाईपूर्वी शाहू विजयी होतील असे कचेश्वरांनी सांगितले होते त्यामुळे शाहूंचा कचेश्वरांवर लोभ जडला. परिणामी कचेश्वरांना छत्रपतीकडून अनेक इनामे मिळाली. त्याबाबतची कागदपत्रेही उपलब्ध आहेत. भावडी, पांगरी, वाकी ही खेड जवळची गावे कचेश्वरांना इनाम मिळाली होती. कचेश्वरांचे चमत्कारही परिसरातील लोककथामध्ये येतात. त्यांना स्वप्नात वाफगाव वाडयात अडकलो असल्याचा दृश्टांत झाला. तेथे जाऊन खोदले असता तेथे विश्णूची मूर्ती मिळाली. ही मूर्ती आजही राजगुरूंच्या देवघरात आहे. तसेच चाकण परिसरात दुश्काळ असताना कचेश्वरांनी पाऊस पाडल्याची कथा आहे. अशा अनेक कथा कागदपत्रातही दिसतात.

कचेश्वर विद्वान होते. त्यांनी लेखनही केले. त्यांचे आत्मचरित्रही उपलब्ध आहे. त्यांच्या चरित्राचा आढावा घेणे हा या लेखनाचा हेतू आहेच पण त्याबरोबर त्यांची वृत्ती व समाजावर असणा—या वारकरी संप्रदायाचा प्रभावही त्यातून आपोआप स्पश्ट होईल.

**साहित्य– साधने**

कचेश्वर ब्रह्मे यांच्या विशयीची अनेक ऐतिहासिक पत्रे उपलब्ध आहेत.3 अर्थात ही बहुसंख्य पत्रे त्यांना मिळालेल्या इनाम, दान विशयक आहेत. या व्यतिरिक्त कचेश्वरांनी 'सुदाम चरित्र', 'गजेंद्रमोक्ष' हे दोन ग्रंथ, संत तुकारामांवरील दोन आरत्या व काही पदे यांचे लेखन केले आहे. ते त्यांच्या विद्वत्तेची साक्ष देतात. या सर्व साधनांचा कचेश्वरांच्या साहित्याचा ऐतिहासिक व वाङ्मयीन दृश्टया स्वतंत्र अभ्यास करता येणे शक्य आहे. येथे केवळ त्यांच्या आत्मचरित्राचा विचार केला आहे. कचेश्वरांची चरित्रपर माहितीही अनेक ठिकाणी आली आहे.4

आत्मचरित्र

कचेश्वर ब्रह्मे यांचे 'आदि'5 हे आत्मचरित्र उपलब्ध आहे. सातारा येथील श्री. महादजी राजगुरू यांचेकडे सदर आत्मचरित्र मिळाले. अर्थात स्वतः विशयी लिहू नये हा प्रघात असल्याने मराठी वाङ्मयाचा आढावा घेतला असता संतांनी आपली आत्मचरित्रे लिहिल्याचे दिसत नाही. काही प्रमाणात माहिती लिहीली असेल पण त्यासाठी स्वतंत्र लेखनप्रपंच मांडलेला नाही. फक्त 'बहिणाबाई, कचेश्वर व निरंजन रघुनाथ या तीन संतांनी आत्मकथा लिहिल्या आहेत.6

अर्थात या आत्मचरित्रांचा उद्‌देश आपली स्वतःची महती सांगणे हा नाही. स्वतःचा मोठेपणा सांगणे हा संतांचा स्वभाव नसतो. ते स्वतःचे मोठेपण सांगत नाहीत. स्वतःला ते अत्यंत साधारण मानतात. त्यामुळे एक तर संत आत्मचरित्र लिहित नाही व त्या अनुशंगाने काही लेखन केले तरी त्यांचा मुख्य रोख गुरूचे महत्त्व व गुरूमुळे, देवामुळे स्वतःची झालेली उन्नती याकडे असतो. स्वतःच्या विकासापेक्षा त्याविकासामागच्या देवाचा वा गुरूचा मोठेपणा वर्णन करणे हेच त्यांचे मुख्य उद्‌दिश्ट असते. आणि आलाच तर त्याच अनुशंगाने आत्मगौरव येतो.7

कचेश्वर आत्मचरित्र लिहितात त्यामागेही संतांप्रमाणेच स्वतःचा मोठेपणा सांगणे हा त्यांचा हेतू नाही. वा त्यांची ती वृत्तीही नाही. त्यांना आलेले अनुभव व त्या अनुशंगाने विठोबा माऊली व संत तुकाराम महाराजांच्या कृपेचा महिमा ते वर्णन करतात. त्यांच्या छोटयाशा

Title: *कचेश्वर ब्रह्मे आणि 'आदि'* Source: Golden Research Thoughts [2231-5063] किशोर जनार्दन लांडेपाटील yr:2012 vol:2 iss:6
.

आत्मचरित्राला विशेशतः त्यातील उत्तरार्धाला त्यामुळे आरतीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. कचेश्वरांनी लिहिलेल्या संत तुकारामांच्या दोन आरत्याही उपलब्ध आहेतच. येथे विवेचन करताना कचेश्वरांच्या आत्मचरित्राचा विचार केला आहे. अर्थात त्यांच्या चरित्राची माहिती देणारी इतरही साधने आहेत त्यांचा वापर केल्यास विस्तार वाढेल व तो स्वतंत्र अभ्यासाचा विशयही होऊ शकेल.

**'आदि' वा 'आदिकथानुसंधान'**

कचेश्वरांचे 'आदि' म्हणून ओळखले जाणारे आत्मचरित्र महत्त्वाचे आहे, हे आत्मचरित्र 111 ओव्यांचे संक्षिप्त आहे. कचेश्वरांनी त्यांच्या छोटयाशा आत्मचरित्रात आपले छत्रपतींशी असलेले जवळचे संबंध रेखाटले नाहीत. मुळात छत्रपती शाहूंबरोबर संपर्क येण्यापूर्वी हे आत्मचरित्र लेखन झालेले असावे. कारण त्यापुर्वीच्या घटनांचे ओझरते उल्लेख त्यात आहेत. साधारण 1708 पूर्वी या ग्रंथाचा लेखनकाल असावा. त्यांचे आत्मचरित्र 'आदि' वा 'आदिकथानुसंवाद' या नावानेही ओळखले जाते आदि म्हणजे पुर्ववृत्त होय.

आपल्या आत्मचरित्राच्या सुरूवातीच्या सहा ओव्यांमध्ये त्यांनी स्वतः मध्ये कसे अवगुण भरले होते. आपण कसे हुड होतो हे सांगितले असुन त्यानंतरच्या 7 ते 21 ओव्यांमध्ये ते जुन्नरला कृश्णभट सहस्त्रभोजने यांचेकडे गेले. त्या काळात ते शाक्त पंथाकडे ओढले गेले. पुढे कृश्णभटांनी त्यांना त्यापाासून परावृत्त केले. तर वडिलांच्या विरोधानंतरही गीता अभ्यासाची ओढ वाढत असल्याची माहिती त्यानंतरच्या पाच ओव्यांमध्ये आली आहे. पुढे कचेश्वर विजापूरला गेले. नारायणबाबांनी त्यांना दृश्टांत दिला. त्यांना विशबाधा होऊन त्यांची प्रकृती खालावली. पुन्हा मुळ देशी आल्यावर महामारीमुळे त्यांना आपला मुक्काम शिरोलीस हलवावा लागला. पुढे त्यांनी हरिभक्ती आरंभीली व किर्तन करण्याचे ठरविले. ही माहिती 44 व्या ओवींपर्यंत आली आहे. किर्तनासाठी संत तुकारामांच्या पाच ओव्या त्यांनी खेड येथे मुक्कामी असणारे संत तुकाराम महाराजांचे चिरंजीव नारायणबाबा यांचेकडे लिहून मागितल्या. त्यांनी कचेश्वरांना संत तुकारामांच्या अभंग वही अंबाजीकडे असल्याने त्यांच्याकडे पाठविले. कचेश्वरांना संत तुकारामांनी दृश्टांतही दिला. ही माहिती 62 व्या ओवीपर्यंत आली आहे.

कचेश्वरांच्या वर्तनावर वैदिक ब्राह्मण टिका करू लागले होते. ते कचेश्वरास भूतबाधा झाली आहे. त्याची आम्हास लाज वाटते. त्यास शिक्षा करा. घरात घेऊ नका. तो कुणाच्याही पाया पडतो. खालच्या वर्गातील लोकांना अलिंगन देतो. अशी गा–हाणी कचेश्वरांच्या वडिलांकडे केली जात व परिणामी वडिलांनीही कचेश्वरांना घराबाहेर काढले. ही हकीकत ओवी क्र. 63 ते 79 यामध्ये आली आहे. यानंतर चरितार्थाचा निर्माण झालेला प्रश्न व देवकृपेने च–होलीचा मिळालेला मोकासा याबाबत वर्णन आले आहे. तर त्यानंतर आपल्या निर्माण झालेल्या इच्छा देवाने कशा पुरविल्या याची माहिती असून देवाची लिला अगाध असल्याची भावना व्यक्त झाली आहे. शेवटच्या सुमारे 30 ओव्या देवाची थोरवी त्यांनी सांगितली आहे.

समारोप

कचेश्वर ब्रह्मे विद्वान होते. आपल्या घराण्याला नवी ओळख देण्याचे कर्तृत्त्व त्यांच्याकडे होते. ते उत्तम लेखक होते. त्यांची ग्रंथ संपदा त्याची साक्ष देते. त्यांचे छत्रपतींशी जवळचे संबंध होते हे त्यांना मिळालेल्या दानपत्रामधून कळते त्याचबरोबर राजगुरू नाव रूढ होण्यातूनही हे लक्षात येते. महत्त्वाचे म्हणजे कचेश्वर समतावादी होते. त्यांनी वडिलांबरोबरच वैदिकांचा होऊ लागलेला विरोध लक्षात न घेता सामान्यांसारखे जीवन जगत गीतेचा केलेला अभ्यास महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्यावर संत तुकारामांच्या विचारांचा – वारकरी संप्रदायाचा पडलेला प्रभाव, प्रत्येक व्यक्तीत देव पाहण्याची वारकरी दृश्टी असल्याने दुस–याच्या पाया पडणे किंवा सर्व माणसे देवाची लेकरे म्हणून उचनीच भेद न करता सर्वांना अलिंगन देणे या सारख्या कृती त्यांची समतेच्या तत्त्वावरील दृढ श्रध्दा दाखविते. प्रस्थापितांचा विरोध डावलून त्यांनी मानवतावादी भूमिका मांडली. माणसातले माणूसपण महत्त्वाचे मानले. संत तुकारामांचा प्रभाव यामध्ये दिसतो. शिवाय श्रध्दा, त्याग, विवेक व मानवता यांचा वारसा खेड परिसरात रूजण्याच्या प्रक्रियेतील कचेश्वरांचे योगदानही दिसते. तसेच कचेश्वरांच्या इतर लेखनात संत तुकारामांचे शिश्य असतानाही तुकाराम विचारांशी विसंगती आली आहे.8 असे काही विद्वान मानतात. ती विसंगती आत्मचरित्रात नाही व दुसरे म्हणजे केवळ आत्मचरित्र वाङ्मय प्रकार लेखनाच्या अनुशंगानेच बोलायचे झाल्यास त्या काळात या प्रकारच्या लेखनाची परंपरा नव्हती त्याकाळात त्यांनी असा लेखनप्रकार हाताळला हे विशेश.

**संदर्भ व टीपा**

1. याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'खेड'चे 'राजगुरूनगर' असे करण्यात आलेले नामांतर होय.
2. सुहासीनी इर्लेकर, तुकारामांची प्रभावळ, औरंगाबाद, 1992, पृ. 87.
3. उदाहरणादाखल शाहु दप्तरातील पुढील पत्रांचा उल्लेख करता येईल –

3.1. रूमाल क्र. 1 पुडके क्र. 15 कागद क्र. 630. 3.2. रूमाल क्र. 1 पुडके क्र. 15 कागद क्र. 726. 3.3. रूमाल क्र. 1 पुडके क्र. 16 कागद क्र. 824. 3.4. रूमाल क्र. 2 पुडके क्र. 1अ कागद क्र. 1206. 3.5. रूमाल क्र. 2 पुडके क्र . 2 कागद क्र. 1394. 3.6. रूमाल क्र. 3 पुडके क्र. 1 कागद क्र. 2144. 3.7. रूमाल क्र. 3 पुडके क्र. 1 कागद क्र. 2173. 3.8. रूमाल क्र. 26 पुडके क्र. 5 कागद क्र. 34468. 3.9. रूमाल क्र. 46 पुडके क्र. 2 कागद क्र. 64030. 3.10. रूमाल क्र. 49 पुडके क्र. 3 कागद क्र. 71941.

4. श्री. विलास राजगुरू हे हुतात्मा राजगुरू यांचे नातू व कचेश्वरांचे दहाव्या पिढीतील वारस आहेत. ते कचेश्वर ब्रह्मे यांचे चरित्र लेखन करीत आहेत.
5. पा.नं. पटवर्धन (सं.पा.), कचेश्वर कृत आत्मचरित्र समाविश्ठ भा.इ.सं.मं. चे वार्शिक इतिवृत्त, शके 1835, पुणे, पृ. 241 ते 246.
6. पहा– ढेरे रा.चिं. (सं.पा.), संतांच्या आत्मकथा, पुणे, 1967, पृ. निवेदन.
7. अधिक चर्चेसाठी पहा– ढेरे रा.चिं. (सं.पा.), संतांच्या आत्मकथा, पुणे, 1967, पृ. 10 ते 12.
8. सुहासीनी इर्लेकर, तुकारामांची प्रभावळ, औरंगाबाद, 1992, पृ. 93.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net